हर नगर ग्राम में
दीप से दीप जलाएंगे।

# राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था

शिक्षण-संस्कार-आरोग्य-कृषी-स्वावलंबन आधारित ग्रामविकास

www.rsgsgramvikas.org

## वार्षिक अहवाल : २०१७-२०१८



हिंदवी स्वराज्याचे पाईक आम्ही, स्वविकासातून ग्रामविकास करू
शिवरायाच्या याभूमीचे सुपुत्र आम्ही, या रयतेचे स्वप्न साकार करू

## श्री शिवसमर्थ बचत गट, मुळशी

राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्थेचा श्री शिवसमर्थ (पुरुष) बचत गट सुरु होऊन यावर्षी बरोबर १० वर्षे पूर्ण होत आहेत. संस्थेचा माजी विद्यार्थी संतोष केसवड यांच्या कल्पनेतून व संस्थेचे मुख्य सल्लागार चिंतामणी चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली या बचत गटाची स्थापना झाली. संस्थेचे विश्वस्थ, कार्यकर्ते व माजी विद्यार्थी यांचे नित्य एकत्रीकरण व्हावे व माजी विद्यार्थी संस्थेच्या कार्याशी जोडलेले राहावेत हा या गटाच्या स्थापनेचा उद्देश होता. सुरवातीच्या काळात गटात २० ते २५ सदस्य होते. त्यात वाढ होऊन ही संख्या आता २६ गावामधील ६१ सदस्य अशी झाली आहे. गटाची बैठक दर माहिन्याच्या दुसऱ्या बुधवारी संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत होते. या बैठकीत गटाचे आर्थिक व्यवहार, वैयक्तिक सुखदुःख, गटातील सदस्यांनी मागील महिनाभर केलेले सामाजिक उपक्रम, देशातील, तालुक्यातील महत्वाच्या घडामोडी यासंबंधी चर्चा होते. प्रति महिना प्रतिसदस्य ५०० रुपयांच्या पटीत शेअर्सची रक्कम जमा केली जाते. त्यातून गटाची आर्थिक बचत आता काही लाखात जमा झाल्याने त्या बचतीतून गरजु सदस्याला अल्प व्याजदराने कर्जरूपाने मदत केली जाते. सर्व आर्थिक व्यवहार बँकेच्या धर्तीवर चालत असल्याने गेली दहा वर्षे तो अत्यंत पारदर्शक पद्धतीने सुरु आहे.

गटाच्या स्थापनेचा मूळ उद्देश डोळ्यासमोर ठेऊन गटाच्या माध्यमाने वर्षभरात विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये प्रामुख्याने शिवजयंती, आंबेडकर जयंती, तालुकास्तरीय जोरस्पर्धा, कौटुंबिक मेळावा व वर्षा सहल हे उपक्रम दरवर्षी ठरलेल्या महिन्यात सातत्याने राबविले जातात.

मागील वर्षी तालुकास्तरीय जोरस्पर्धा भुगाव येथे घेण्यात आली. यात लहान मोठ्या १२० मल्लांनी सहभाग नोंदवला. दारवली येथे आंबेडकर जयंती निमित्त तालुकास्तरीय धावणे स्पर्धा झाली. यात ८० स्पर्धकांनी सहभाग घेतला. कासार आंबोली येथे कौटुंबिक मेळावा उत्साहात पार पडला. शिंदेवाडी येथे पहिल्यांदाच विजय दिनाच्या निमित्ताने माजी सैनिकांचा सत्कार घेतला. पिरंगुट येथे स्वामी विवेकानंद जयंतीच्या निमित्ताने युवादिन साजरा करण्यात आला. यावेळी गटातील विशेष कार्य केलेल्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. गटातील सर्व सदस्य या गटाची प्रेरणा घेऊन आपापल्या क्षेत्रात उत्कृष्ट पद्धतीने आपल्या कामाचा ठसा उमटवत आहेत. पुढील काळात हा शिवसमर्थ बचत गट तालुक्यातील सर्व गावांचे प्रतिनिधीत्व करणारा असावा या करीता सामाजिक कार्याची आवड असणारे तालुक्यातील सर्व गावांचे प्रतिनिधी जोडण्याचे काम सुरु आहे. संतोष कडू, रमेश अदमाने, संतोष केसवड, नवनाथ बोडके, महेश मोहोळ यांनी २००८ ते २०१६ पर्यन्त अध्यक्ष व सचिव या नात्याने उत्तम रचना लावून दिली आहे. सध्या गटाचे अध्यक्ष म्हणून ज्ञानेश्वर पवळे, उपाध्यक्ष म्हणून विलास चोंधे व सचिव म्हणून योगेश गोसावी नियोजनबद्ध पद्धतीने काम करत आहेत.

**- योगेश गोसावी**



*डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त धावणे स्पर्धा*



*डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त व्याख्यान, दारवली*



*विजयदिनानिमित्त पूर्व सैनिक सत्कार सोहळा, शिंदेवाडी*

## हिम्मत शाळा



हिम्मत शाळेचा गणपती उत्सव



प्रातःस्मरण

शाळाबाह्य विद्यार्थांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या हेतुने सुरु करण्यात आलेल्या हिम्मत शाळेचे हे सहावे वर्ष. यावर्षी एकूण २५ विद्यार्थांनी प्रवेश घेतला. २३ विद्यार्थी शाळेत नियमित उपस्थित राहिले. २३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. १५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासाबरोबर 'पुणे विद्यार्थी गृहाच्या' महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे यांच्या माध्यमाने मुलभूत वीजतंत्री तंत्रज्ञानाची ओळख व आधुनिक शेती हे दोन व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविले गेले. त्यातील तीन विद्यार्थांनी आयटीआयला प्रवेश निश्चित केला. पाच विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी प्रवेश तर एका विद्यार्थ्याचा हॉटेल मॅनेजमेंटसाठी प्रवेश. विद्यार्थ्यांनी तालुक्यातील वृंदावन काऊ क्लब, भुकूम येथील गो शाळेला भेट तसेच घोटावडे येथील साई इलेक्ट्रीकल या दुकानाला भेट दिली. तसेच घोटवडे फाट्यावरील नंदु खैरे या माजी विद्यार्थाच्या आनंद डेअरीला भेट देऊन तेथील सुरु असणारे कार्य समजुन घेऊन व्यावसायिक दृष्टीकोन आत्मसात करण्याचा प्रयत्न संस्थेद्वारा करण्यात आला.

**- योगेश कोळवणकर, हिम्मत शाळा**

## बाल विद्यामंदिर, पिरंगुट

शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये बाल विद्यामंदिर येथे १९ मुले व ६ मुली असे २५ विद्यार्थी होते. साधारण जून ते एप्रिल या काळात दोन सत्रात शाळेत पुढील कार्यक्रम राबविण्यात आले. १५ ऑगस्ट, पालखी, गणपती, राखी पौर्णिमा, नागपंचमी, २६ जानेवारी. विविध उपक्रमांद्वारे मुलांना सहभागी करून त्या सणांचे महत्व सांगण्यात आले. या व्यतिरिक्त ४ पालक सभांमधुन आलेल्या सूचनांचा विचार करून काही सुधारणा केल्या.



सन २०१७-२०१८ विद्यार्थी व शिक्षक




वार्षिक स्नेहसंमेलन

डॉ. मंजिरी वैद्य यांच्या माध्यमातून मुलांसाठी आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. तसेच डॉ. वैद्यांनी बालवाडीसाठी कपाट दिले. श्री. प्रविण गोखले यांनी ३० स्वेटर दिले. पालकांसाठी महिला दिनाला स्त्रीयांच्या समस्यांवर व्याख्यान आयोजित केले. यात डॉ. मृणालिनी चितळे यांनी मार्गदर्शन केले.

स्नेहसंमेलनात मुलांच्या तसेच पालकांच्या विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमात उत्साही सहभाग होता व सर्व आजुबाजूच्या शाळेबाहेरील लोकांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेची जागा सुंदर चित्रांनी चांगल्या प्रकारे चित्रकार श्री. रवी सकट यांनी रंगवून दिली.

यावर्षी विद्यार्थी संख्येत वाढ होवून फी वाढवून देखील चांगला प्रतिसाद आहे. सौ राजश्री गरूड , सौ ज्योती पुरेकर या दोन्हीही शिक्षिकांना यावर्षी काय शिकवायचे हे ठरवून त्याची माहिती पालकांनाही देण्यात आली.

**- सौ. संगीता धोट्ये**



## स्वामी विवेकानंद विद्यालय, आसदे

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळेची एकूण विद्यार्थी संख्या २०७ होती. त्यामध्ये ९४ मुली व ११३ मुले होती. मार्च २०१८ एसएससी परीक्षेचा निकाल ९६.८३ टक्के लागला. एकूण ३२ विद्यार्थ्यांपैकी ३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यामध्ये विशेष प्राविण्य १०, प्रथम श्रेणी १४ व द्वितीय श्रेणीत ७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रथम कांचन अनिल निकाळजे ८७ टक्के, द्वितीय धनश्री देविदास ठोंबरे ८३.४० टक्के, तृतीय उमा लक्ष्मण केंदे ७८ टक्के. इयत्ता १० वीतील ३ विद्यार्थीनीची आत्मजा फौंडेशनकडून शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आली.

संस्कार भारती मुळशी समिती यांचे तर्फे विद्यार्थ्यांसाठी नाट्य प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. समवेदना संस्थेकडून सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी व समुपदेशन करण्यात आले. तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत विविध क्रीडा प्रकारात विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन बक्षिसे मिळवली. इयत्ता ५ वी / ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत एक विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरला. एनटीएस एमएमएमएस या स्पर्धा परीक्षा तसेच एलिमेंटरी न इंटरमिजीएट या चित्रकला परीक्षेमध्ये विद्यार्थी सहभागी झाले.

**सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रम -** योग दिन, आषाढी एकादशी दिंडी, शिक्षक दिन, भोंडला, शरद मल्हार महोत्सव, स्वामी विवेकानंद जयंती, मेहंदी स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, शालेय क्रीडा स्पर्धा, वन भोजन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुण्यतिथी, वीर सावरकर पुण्यतिथी, विज्ञान जत्रा, इयत्ता १० वी शुभेच्छा समारंभ इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शाळेची शैक्षणिक सहल मुंबई येथे तारांगण पाहण्यासाठी गेली होती. त्यामध्ये १३९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्काऊट गाईड पथकाने जिल्हा मेळाव्यात सहभाग घेतला.

हॅपी स्कूल प्रकल्पांतर्गत रोटरी क्लब शनिवारवाडा कडून शाळेला कपाटे, टेबल, खुर्च्या, भूगोल पेटी, गणित पेटी, इंग्रजी पेटी हे अध्यापन साहित्य मिळाले. रोटरी क्लब जिल्ह्याकडून प्रयोगशाळा साहित्य व लोखंडी बाके मिळाली. या वर्षी शांतीलाल मुथा फौंडेशनकडून शाळेचे मूल्यमापन करण्यात आले.

**- सतीश शिंदे**

## मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख (Introduction to Basic Technology)

इ. ८ वी ते १० वी या तीन वर्गातील विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षणात्मक योजन आपण २००६ पासून आपल्या स्वामी विवेकानंद विद्यालयात राबवित आहोत. जेव्हा आपण हाताने काम करत करत शिकतो त्या गोष्टी आपण कधीही विसरत नाही. हा या अभ्यासक्रमाचा उद्देश आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना स्वावलंबी होण्यासाठी व समाजाच्या काही गरजा गावातच पूर्ण होण्यासाठी उपयोगी पडत आहे. मुलांमधील कौशल्याचा विकास व्हावा आणि पुढे त्यांच्यातील उद्योजक जागा व्हावा ही त्यामागची संकल्पना आहे. पूर्वी हा अभ्यासक्रम ‘IBT’ म्हणजे ’Introduction to Basic Technology’ (मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख) म्हणून ओळखला जातो. आता अभ्यासक्रमात काही प्रमाणात बदल केला आहे. तसेच त्याचे नावही बदलले आहे. आता हा अभ्यासक्रम ’MSFC’ (Multi Skill Foundation Course) या नावाने सुरु आहे. शासकीय स्तरावर देखील याची दखल घेण्यात आली आहे.





**अभियांत्रिकी -** या विभागात मुलांना मापन, वेल्डिंग, नळकाम, सुतारकाम, सोल्डरिंग तसेच बांधकाम इत्यादी प्रात्यक्षिके घेतली जातात. या वर्षी गावच्या नावाचा बोर्ड, सोलर ड्रायर, महालक्ष्मी स्टँड, फोटो फ्रेम, स्वीच बोर्ड,, सिलेंडर स्टँड, पोळी पाट, सूचना पेटी, बाकांची दुरुस्ती (८ नग) इत्यादी कामाचा अनुभव मुलांनी घेतला आहे. तसेच मशीनवर विविध आकार कटींग केले. एक सोलर कुकर दुरुस्त केला. अशा प्रकारे मुलांनी विविध प्रात्यक्षिकाद्वारे कामाचा अनुभव घेतला.

**उर्जा पर्यावरण विभाग -** या विभागात मुलांनी वायरिंग करणे, ट्युब दुरुस्ती व ट्युब व फॅन फिटींग, शेगडी दुरुस्ती, सोलर प्लेटचा उपयोग करणे इ. कामाचा अनुभव घेतला आहे. तसेच बंधाऱ्याची जागा निवडणे, आखणी करणे व सर्वे करणे इ. प्रात्यक्षिके मुलांनी केली आहे.

**शेती, पशुपालन -** या विभागात बीज प्रक्रिया करणे, रोप तयार करणे, अँझोला वाढविणे, वाफे सऱ्या करणे, स्प्रींकलर वापरुन पाणी देणे ही प्रात्यक्षिके केली आहेत. माती परिक्षण, फवारणी करणे, गांडुळ खत, जीवामृत, दशपर्णी, अर्क इत्यादी प्रात्यक्षिके केली. मिरची व वांगी रोपांची लागवड केली. तसेच वेगवेगळ्या झाडांची कटिंग लावली. जनावरांचे तापमान मोजणे, दातांवरून वय ठरविणे व अंदाजे वय काढणे इ. प्रात्यक्षिकांचा अनुभव घेतला. दुध डेअरी व दवाखान्याला (गुरांच्या) भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती मुलांनी घेतली.

**गृह आणि आरोग्य -** यावर्षी इ. ५ वीच्या मुलांचे रक्त गट व महिलांचे हिमोग्लोबिन तपासणी केली. पाककृती मध्ये मैद्यापासून पापडी शेव बनविली. चोको इटली केक बनविला. तसेच बाकरवडी व रुमाला बनविले. कापडी पिशव्या शिवण्याचा अनुभव मुलांनी घेतला. पाणी परिक्षण, भेसळ ओळखणे.

आपल्या शाळेतील मुलांना आयबीटी विषय व त्यातील समस्या चांगल्या प्रकारे समजाविण्यासाठी (Video Conferencing) द्वारे मुलांना पाबळ येथून मार्गदर्शन केले. एल ॲण्ड टी या कंपनीच्या माध्यमातून जवळपास ७ मुलांनी आयटीआयला प्रवेश घेतला आहे. एल ॲण्ड टी या कंपनीच्या मदतीने आयबीटी विभागातील हत्यारे व साधने अद्ययावत केली आहेत. अशा प्रकारे आयबीटी मध्ये अनुभव घेतल्यामुळे अनेक मुले आपल्या घरातील काही कामे करण्यास संकोच करीत नाही. यावर्षी आयबीटी शिकणाऱ्या तीन निदेशकांनी डीबीआरटीची परीक्षा दिली आहे.

**- वसंत बोराडे**

## विद्यार्थीनी वसतीगृह (शिळेश्वर)



*मुलींचे वसतीगृह, शिळेश्वर*

वसतीगृहाला यावर्षी १० वर्षे पूर्ण झाली. दोन विद्यार्थीनींना उच्च व व्यावसायिक शिक्षणासाठी उद्युक्त करु शकलो. या दोघींनी दहावी नंतर ५ वर्षे शिक्षण घेऊन (General Nursing & Midwifery) पूर्ण केले. निकिता कोकरेला ८४ टक्के व अनिता कोकरेला ७८ टक्के मिळाले. त्यांच्या महाविद्यालयातून निकिता पहिली व अनिता तिसरी आली. आता आपल्याकडे मुलींची संख्या वाढू लागली आहे. मागील वर्षी २५ मुलींनी प्रवेश मागितला. म्हणून आपण निकिता कदम व अनिता ढेबे या दोघींना महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत प्रवेश घेऊन शिकविले. यावर्षी पाचवीच्या ३, सहावीच्या ३, सातवीच्या ६, आठवीच्या ८, नववीच्या ३ व दहावीच्या २ अशी एकूण मुलींची संख्या २५ आहे. दहावीतील विद्या शिंदेला ७८.४० व अनिषा ढेबेला ६० टक्के मिळाले. दोघींनी व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला.

**- राठोड काका**

**विद्यार्थी वसतीगृह (शिळेश्वर)** वसतीगृहाला यावर्षी १५ वर्षे झाली. यावर्षी ८ विद्यार्थी होते. अनेक विद्यार्थी व्यवसायात स्थिर होताना दिसत आहेत. ते व्यवसायाबरोबर संस्थेच्या कामातही मदत करत आहेत. यावर्षी पाचवीत १, सहावीत ३, सातवीत १, आठवीत १, सहावीत ३, सातवीत व आठवीत १, नववीत २ अशी संख्या होती.

**- अशोक गोजरेकर**

## मराठवाडा विकसन प्रकल्प, जि. धाराशिव

**गो आधारित शेती प्रयोग** - तालुकाशः गावांची व शेतकरी संख्या

| तालुके | गावे | शेतकरी संख्या | खत वापरण्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| उमरगा | २३ | ७३ | जीवामृत, घनामृत |
| लोहारा | १२ | ३८ | दशपर्णी, ताक फवारणी |
| तुळजापूर | २५ | १०२ | शेणखत, गोमुत्र फवारणी |
| धाराशिव | ११ | ४१ | वरील सर्व प्रयोग |
| ४ | ७१ | २५४ | |



*जीवामृत निर्मिती प्रकल्प, अनदूर, ता. तुळजापूर, जि. धाराशीव*

यामध्ये अठरा गांव अशी आहेत ज्यात पाच किंवा त्यापेक्षा जास्त शेतकऱ्यांनी प्रयोग केलेली गावे आहेत. अशी शेतकरी संख्या १३९ आहे.

**महाविद्यालय संपर्क -** एन.एस.एस. शिबिराच्या माध्यमातून ३ महाविद्यालयातून व्याख्यान-ग्रामविकासात युवकांचे योगदान व गो आधारित शेती. सहभागी विद्यार्थी संख्या १४०, प्राध्यापक संख्या १५.

**शासनाच्या वतीने धाराशिव जिल्हा कृषी महोत्सव -** यात शेतकऱ्यांना मार्केट मिळावे याकरीता विविध गावातून पाच स्टॉल मांडण्यात आले. गो आधारित शेती उत्पादने, कांदा, रामफळ, शेती अवजारे याचा शेतकऱ्यांना चांगला फायदा झाला. आठ शेतकऱ्यांना गो आधारित तथा झीरो बजेट प्रशिक्षणासाठी विविध ठिकाणी म्हणेज कणेरी मठ व सुभाष पाळेकर यांच्या शिबिरात पाठवले. त्याचा चांगला परिणाम म्हणजे काही मंडळींनी गायी खरेदी केल्या व शेती प्रयोग सुरु केले.



*उस्मानाबाद येथील कृषीमाल विक्री प्रदर्शनात शेती माल व अवजारांची विक्री*

पुणे येथे झालेल्या गोविज्ञान परिषदेसाठी व मार्केटसाठी कसबे, तडवळ येथील शेतकरी गटांनी (९) सहभाग घेतला.

**तोरंबा ता. लोहारा भारतमाता मंदिर प्रकल्प वृत्त -** अभ्यासिका - सहा ते सात महिन्यांपासून सुरु आहे. इ. ५ वी ते १० वी चे विद्यार्थी यात येतात. उपस्थिती २५ ते ३५ असते.

रथसप्तमी - विविध स्पर्धांचे आयोजन. सूर्यनमस्कार स्पर्धा या मध्ये सहभागी विद्यार्थी २२५, माजी सैनिक सत्कार समारंभ संख्या ७, अन्य उपस्थित नागरिक ३६ एकूण २६८ संख्या या कार्यक्रमात सहभागी झाली.

आपल्या प्रयत्नातून जनकल्याण समितीकडून पाणी साठवणुकीसाठी पाच हजार लिटरची टाकी गावाला उपलब्ध करून दिल्यामुळे गावाला त्याचा चांगला फायदा होत आहे.

गावातील तरुण मंडळींनी (संभाजी महाराज जयंती) एकत्र येऊन भारतमाता मंदिराच्या परिसराची स्वच्छता करून मिरवणुक काढली.

या सर्व वर्षभराच्या कार्यात संस्था, समितीचे व अन्य ५० जणांचे चांगले सहकार्य मिळाले. रक्षाबंधन व मकरसंक्रमण उत्सवानिमित्त सहा वसतीगृहांशी संपर्क केला.


*जीवामृत निर्मिती कार्यशाळा*


*गो-माता पूजन, शिवकरवाडी*

यावर्षीचा १०० गावी संकल्प, तसेच विशेषबाब शिवकरवाडी हे १०० टक्के गोआधारित शेती प्रयोगासाठी दत्तक घेतले.

## महिला विभाग


*महिला बचतगट बैठक, मुळशी*

आपण २७ गावांमधुन ६२ बचतगट चालवितो. १७ बचतगटांची पुर्नरचना व नवे सभासद जोडून तयार केले आहेत. माले व भूगांव येथील १००/१०० महिलांचे बचतगट सुरळीत सुरु आहेत. माले येथील बचतगट १९ लाख २० हजारावर गेला आहे. यामुळे महिलांच्या आर्थिक गरजा अगदी सहज भागतात. त्यातूनच महिलांची एकी बघायला मिळते. ६२ पैकी २४ गटांच्या आठवडी बैठका सुरु आहेत. या २४ गटांना प्रत्येकी १,५०,००० रुपये (दीड लाख रु.) शासनाकडून मिळवून देण्यात आले. तसेच १३ गटांना बँकेकडून ४२ लाख रुपयांचे कर्ज मिळवुन दिले. या कर्जांमधुन महिलांनी स्वतःची दुकाने गारमेंट, शिवण यंत्रे, मिरची कांडप, घरघंट्या, शेवई मशीन इत्यादी वस्तु घेतल्या आहेत. जागतिक महिला दिनानिमित्त पंचायत समितीने मुळशी जत्रा भरविली होती. त्यामध्ये ३ स्टॉल ६ महिलांचा सहभाग, शैलेश सभागृहात दिवाळी प्रदर्शनात सहभाग, सावित्री यात्रा, भीमथडी, महालक्ष्मी-मुंबई या सगळ्या प्रदर्शांमध्ये दोन लाखा पर्यंत उलाढाल झाली.

गावा-गावांतून स्वच्छतेसाठी जनजागृती. काही गावात भाग ठरवून देऊन महिलांकडुन  ग्राम स्वच्छता. माले ग्रामिण रूग्णालय समितीवर महिला प्रतिनिधी म्हणून काम पाहिले. गेल्या वर्षात १४ बैठका झाल्या.

काही ठिकाणी बालक व पालक या विषयावर व्याख्यान ग्राम सभेत सहभाग. सीआरपी म्हणून माले, शेरे गावात नियुक्ती. महिला बचतगटाची पंजाब, जम्मु-कश्मिर, वैष्णवदेवी, अमृतसर दर्शन सहल केली. एकूण ४० महिला होत्या.

**कार्यक्रम -** अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी, सावित्रीबाई फुले जयंती, हळदी-कुंकू व जागतिक महिला दिन दोन ठिकाणी. होम मिनिस्टर कार्यक्रम, कॅन्सर हेल्थ कॅम्प, महिला दिनानिमित्त विविध गुणदर्शन. या सर्वांमध्ये ८६० महिलांचा सहभाग. यामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रातील मृणालिनी चितळे, डॉ. वैदही नगरकर, पौर्णिमा मेहता, संगीता धोटे व वाळिंबेताई यांचे मार्गदर्शन लाभले.

**- स्वाती कदम**

## स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा ग्रंथालय व अभ्यासिका



पिरंगुट येथील नवीन स्पर्धा परीक्षा केंद्र

१) अंबडवेट येथील निवासी परीक्षा केंद्रावरील निवासी ९ व अनिवासी ३.

२) १२ जानेवारी २०१८ रोजी पिरंगुट येथे नवीन अभ्यासकेंद्र सुरु केले. प्रवेश संख्या १७.

३) कृष्णा नेवरे या विद्यार्थ्याची आरटीओ पदी निवड.

४) संकेत काशीलकर हा विद्यार्थी सीए पूर्व परीक्षा उत्तीर्ण झाला.

५) मनोज पाटील व नथ्याबा बोडरे हे दोघे एमपीएस्सीची पूर्व परीक्षा उत्तीर्ण झाले असून मुख्य परीक्षेची तयारी करत आहेत.

६) अनिकेत कोतकर युपीएस्सीची पूर्व परीक्षा उत्तीर्ण झाला असून मुख्य परीक्षेची तयारी करत आहे.

**- सखाहरी वायबसे**



शेतकरी मेळावा, शेरे, ता. मुळशी

**शेती (मुळशी)** यावर्षी १३ गावांमधुन २२० शेतकऱ्यांनी चतुःसुत्री पद्धतीने भात लागवडे केली. त्यांच्या उत्पन्नात २० ते २५ टक्के वाढ झाली.

फेब्रुवारी महिन्यात पावटा या बियाणावर सेंद्रिय पद्धतीने २५० शेतकऱ्यांनी प्रक्रिया केली. त्यामुळे पावसाळ्याच्या आधी पिके चांगली मिळाली. १० शेतकऱ्यांनी २०० फळझाडे लावली. त्यासाठी जीवामृताचा वापर केला.

मार्च महिन्यात भुकूम येथील २५ शेतकऱ्यांनी निर्माल्यापासून बनविलेल्या खतावर रब्बीचे पिक घेतले. (पिकांची नाव - दोडका, काकडी, वांगी, टोमॅटो, भुईमुग ही पिके घेतली.) त्यांच्या उत्पन्नात ४० ते ५० टक्यांनी वाढ झाल्याचे दिसून आले. या पिकाला जीवामृत वापरले आहे. एप्रिल महिन्यात २० शेतकऱ्यांनी दशपर्णी अर्काची फवारणी केली. मे महिन्यात ५ शेतकऱ्यांनी कोंबडी पालन केले. मे महिन्यात खुबवली, गावडेवाडी, आसदे, भादस, अकोले व शिळेश्वर या गावांमध्ये ७०० कोंबड्यांना मोफत लसीकरण केले.

एप्रिल महिन्यात शेरे येथे दगडे पाटील यांच्या माध्यमातून ५० शेतकऱ्यांचा मेळावा घेतला. सेंद्रिय शेती, गोपालन व जनावरांचे आजार या विषयावर मेळाव्यात श्री लुंकड साहेब व श्री. पाटील यांनी मार्गदर्शन केले. जून महिन्यात १० शेतकऱ्यांनी मिठाच्या द्रावणात भाताच्या बीया बुडवून बीज प्रक्रिया केली. ऑगस्ट महिन्यात १० शेतकऱ्यांनी १५० फळझाडे लावली. याच महिन्यात गादी वाफ्यावर भाताची रोपे तयार केली.

**प्रशांत पाटील, शेती, मुळशी**

---

**संस्थेचे हितचिंतक -** ॲटलास कापको व पांडव परिवार, बॉब्स्ट, रेल फोर, ठकार ट्रस्ट, य.स. अध्ये, रवजीत गमरा, पार्ले हिंदु देवालय ट्रस्ट, रोची इंजिनियर्स, शनिवारवाडा रोटरी क्लब यांचे आर्थिक सहाय्य लाभले.

---

**आवाहन -** संस्थेसाठी आपण देणगी देऊन व कार्यकर्ता म्हणून सहभागी होऊ शकता. संस्थेला ८० जी सवलत उपलब्ध आहे. धनादेश **'राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था'** (Rashtriya Sarvangin Gramvikas Sanstha) या नावाने देऊ शकता.

---

हर नगर ग्राम में

**राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था**

दीप से दीप जलाएंगे।

गट क्र. २९७, प्लॉट क्र. २२ अ, दत्त मंदिराजवळ, अंबडवेट, ता. मुळशी, जि. पुणे ४१२ १०८. (भारत) ईमेल : info@rsgsgramvikas.org

**www.rsgsgramvikas.org** **https://www.facebook.com/RSGS-Gramvikas-583555425376808**

संपर्क : अनिल व्यास ८८८८८७१३१०, सौ. पूनम मेहता ९४२२० ८८६८४, रवींद्र देव ९८२२० ९८०५३, प्रदीप पाटील ७३८७५ ४३४७८